# डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे

(महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची स्वायत्त संस्था)
२८, क्वीन्स गार्डन, कॅम्प, पुणे - ४११ ००१.

Email : competitiveupsc@barti.in Website: http//:barti.maharashtra.gov.in

## अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकातील उमेदवारांसाठी UPSC (Civil Services) Examination-2020 स्पर्धा परीक्षेच्या(पूर्व व मुख्य परीक्षा) पूर्वतयारी प्रशिक्षणाकरिता दिल्ली येथील नामवंत कोचिंग इंस्टीटयूटमध्ये अनिवासी व नि:शुल्क प्रशिक्षण

महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकातील **२०० उमेदवारांना बार्टी मार्फत प्रशिक्षणासाठी पुरस्कृत (Sponsor) करण्यात येणार आहे.** उमेदवारांची निवड करण्याकरिता **COMMON ENTRANCE TEST (BARTI- DELHI-CET-2020)** आयोजित करण्यात येत आहे. तरी त्यासाठी ऑनलाईन अर्ज मागविण्यात येत आहे.

**प्रशिक्षण कालावधीमध्ये उमेदवारास मिळणारे लाभ (प्रती विद्यार्थी)**

१.१ दिल्ली येथील कोचिंग संस्थेस देण्यात येणारी संपूर्ण कोचिंग फी

१.२ विद्यावेतन प्रती माह रु. १२,०००/- (उपस्थितीनुसार)

१.३ पहिल्या महिन्यातील आर्थिक सहाय्य रु. ३,०००/-

१.४ दिल्ली येथे सुरवातीच्या प्रवासाकरिता रु. ५०००/- व कोचिंग क्लास संपल्यानंतर परतीच्या प्रवासासाठी रु. ५०००/- प्रवास भत्ता

| वेळापत्रक | |
|---|---|
| Online अर्ज करण्याचा कालावधी | दि. **२६** फेब्रुवारी ते ७ मार्च २०१९ |
| ई -प्रवेशपत्र (Admit Card) मिळण्याची तारीख | दि. **१२** मार्च ते १६ मार्च २०१९ |
| **BARTI-DELHI-CET-2020** परीक्षेची तारीख | दि. १७ मार्च, २०१९ |

**उपलब्ध प्रशिक्षणार्थी पदसंख्या – २००**

| तपशील | एकूण |
|---|---|
| अ) सर्वसाधारण | १२२ |
| ब) महिला | ५२ |
| क) दिव्यांग | ६ |
| ड) वंचित जातीचा घटक (वाल्मिकी व तत्सम जाती, होलार, बेरड, मातंग, मांग, मादगी इ.) | १० |
| इ) विशेष बाब | १० |
| **एकूण** | **२००** |

**पात्रता-**

१. महाराष्ट्र राज्यातील रहिवासी व अनुसूचित जाती तथा नवबौद्ध घटकातील उमेदवार असावा

२. UPSC (Civil Services) Examination -2020 साठी पात्र असावा

३. बार्टी पुरस्कृत UPSC प्रशिक्षणाचा [यशदा, प्री आयएएस (SIAC), दिल्ली येथील अनिवासी प्रशिक्षण, महाराष्ट्र राज्यातील अनिवासी व निवासी प्रशिक्षण या प्रशिक्षणांचा यापूर्वी झालेल्या प्रशिक्षणाचा)] लाभ घेतलेला नसावा. अशा उमेदवारांनी अर्ज केल्यास तो अपात्र ठरविण्यात येईल.

४.रु. ६ लाखापेक्षा अधिक कौटुंबिक उत्पन्न असलेले उमेदवार प्रशिक्षणास पात्र नाहीत.

सूचना - वंचित जातीचा घटक केवळ परीक्षेमध्ये सहभागी उमेदवारांसाठीच लागू असेल. गुणवत्ता यादीत समावेश नसलेल्या जातीचे उमेदवार वंचित जातीच्या घटकांना संधी म्हणून गुणानुक्रमे निवडण्यात येतील. उमेदवाराने सकल कौटुंबिक उत्पन्नाचा दाखला online फॉर्मसोबत जोडणे बंधनकारक आहे.

टीप: गुणवत्ता यादीतील रु. ३.०० लाखापेक्षा कमी उत्पन्न मर्यादा असलेल्या पात्र उमेदवारांना प्रशिक्षणातील सर्व जागांसाठी प्राधान्याने प्रवेश देण्यात येईल. त्यानंतर जागा रिक्त राहिल्यास उर्वरित जागांवर रु. ३.०० लाखा-पेक्षा जास्त ते रु. ६.०० लाख उत्पन्न मर्यादा असलेल्या पात्र उमेदवारांना गुणवत्तेनुसार प्रवेश देण्यात येईल. Online अर्ज करण्यासाठी http://barti.maharashtra.gov.in> NOTICE BOARD >BARTI-DELHI-CET-2020-APPLY ONLINE. अधिक माहितीसाठी http://barti.maharashtra.gov.in>NOTICE BOARD >BARTI-DELHI- CET-2020- ADVT and GUIDELINES या लिंकवर क्लिक करा.

टिप- online फॉर्म भरणे किंवा प्रवेश पत्र डाऊनलोड इ बाबतच्या अडचणीसाठी संपर्क – 1800-212-005599 किंवा bartihelp@gmail.com

**कैलास कणसे (भापोसे)**
**महासंचालक, बार्टी**

**Advt/UPSC-DELHI-CET - 2020/24/02/2019/11**

size : 16x12

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी),पुणे
(महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची स्वायत्त संस्था)
मुख्यालय : २८ क्वीन्स गार्डन, कॅम्प, पुणे ४११००१
दूरध्वनी क्र. ०२०-२६३४ ३६००/२६३३ ३३३० फॅक्स :०२०-२६३३ ३५९६
E-mail: dg@barti.in Website: www.barti.in

# महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जाती व नव बौद्ध उमेदवारांना दिल्ली येथील नामांकित कोचिंग संस्थेमध्ये संघ लोकसेवा आयोग –नागरी सेवा परीक्षा – २०२० साठी प्रशिक्षण योजना

**टिप – उमेदवारांची निवड ही दि. १७ मार्च २०१९ रोजी आयोजित BARTI-DELHI-CET-2020 या निवड चाळणी परीक्षेतील प्राप्त गुणांनुसार करण्यात येणार आहे.**

## परीक्षेचे वेळापत्रक –

| | |
|---|---|
| Online अर्ज करण्याचा कालावधी | दि.२६ फेब्रुवारी ते ७ मार्च २०१९ |
| ई-प्रवेशपत्र डाऊनलोड | दि. १२ मार्च ते १६ मार्च २०१९ |
| BARTI-DELHI-CET-2020 परीक्षेचा दिनांक | दि. १७ मार्च २०१९ |

**BARTI-DELHI-CET-2020 या चाळणी परीक्षेकरिता अर्ज करण्यासाठी मार्गदर्शक सूचना-**

१. पात्र उमेदवारांला वेब बेस्ड (Web-based) ऑनलाईन अर्ज https://barti.maharashtra.gov.in >Notice Board > BARTI-DELHI-CET-2020 > APPLY ONLINE या वेबसाईट द्वारे दि. २६ फेब्रुवारी ते ७ मार्च २०१९ दरम्यान सादर करणे आवश्यक राहील.

२. अर्ज करतेवेळी उमेदवाराने त्यांचे नाव, जन्म दिनांक, ईमेल पत्ता, मोबाईल क्रमांक, निवासाचा पत्ता, BARTI-DELHI-CET-2020 परीक्षेकरिताचे परीक्षा केंद्र अचूक भरावे.

**पात्रता:**

- उमेदवार हा महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जाती / नव बौद्ध उमेदवार असावा.
- पदवी परीक्षेस बसलेले उमेदवार प्रवेश परीक्षेस तात्पुरते पात्र असतील. परंतु प्रवेश परीक्षेच्या निकाला आधारे प्रशिक्षणासाठी पात्र ठरणाऱ्या उमेदवारांनी विहित केलेल्या अंतिम दिनांकापर्यंत पदवी परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.
- तसेच उमेदवार संघ लोकसेवा आयोग –नागरी सेवा परीक्षा - २०२० परीक्षेस पात्र असावा.

टिप : जर उमेदवाराने बार्टी मार्फत आयोजित केलेल्या पुढील प्रशिक्षणाचा लाभ घेतला असेल तर असे विद्यार्थी उमेदवार सदर प्रशिक्षणाचा लाभ घेण्यास अपात्र आहेत.

१. महाराष्ट्र राज्यातील पुणे, औरंगाबाद, नागपूर येथील निवासी प्रशिक्षण
२. यशदा व भारतीय प्रशासकीय सेवा पूर्व प्रशिक्षण केंद्रातील (SIAC मुंबई, औरंगाबाद, अमरावती, नागपूर, नाशिक व कोल्हापूर) बार्टी पुरस्कृत प्रशिक्षण
३. दिल्ली येथील नामांकित संस्थेमधील प्रशिक्षण
४. महाराष्ट्र राज्यातील संघ लोकसेवा आयोग - नागरी सेवा परीक्षा प्रशिक्षण
५. ज्या उमेदवारांनी यापूर्वी बार्टी मार्फत राबविल्या जाणाऱ्या संघ लोकसेवा आयोग - नागरी सेवा परीक्षेचे पूर्ण वर्षाचे प्रशिक्षण घेतले आहे असे उमेदवार अर्ज करण्यास अपात्र आहेत. यापूर्वी त्या

उमेदवाराने बार्टीच्या प्रशिक्षणाचा लाभ घेतला असल्यास संबधित उमेदवाराची प्रशिक्षणातील उमेदवारी रद्द करण्यात येईल.

३. उमेदवाराने एकच online अर्ज भरावा. एकापेक्षा अधिक वेळेस अर्ज केल्याचे आढळून आल्यास, फक्त पहिलाच अर्ज ग्राह्य धरण्यात येईल.
४. महाराष्ट्रातील विविध केंद्रांवर BARTI-DELHI-CET-2020 ही परीक्षा घेण्यात येईल. उमेदवारांनी online अर्ज करतेवेळी योग्य परीक्षा केंद्र निवडावे. एकदा दिलेले परीक्षा केंद्र कोणत्याही परिस्थितीत पुन्हा बदलवून देण्यात येणार नाही. परीक्षेस उपस्थित राहण्यासाठी उमेदवारास कोणताही प्रवासभत्ता प्रदान करण्यात येणार नाही.
५. या परीक्षेचे प्रवेशपत्र https://barti.maharashtra.gov.in>Notice Board> BARTI-DELHI-CET-२०२०-ADMIT CARD या लिंकवर दि. १२ मार्च २०१९ ते दि. १६ मार्च २०१९ पर्यंत उपलब्ध असेल. प्रवेशपत्रावर उमेदवारास परीक्षेची तारीख, वेळ व परीक्षा केंद्र दिले जाईल. उमेदवारास इतर कोणत्याही संवादाच्या माध्यमाद्वारे सदर माहिती कळविण्यात येणार नाही.
६. जाहिरातीत नमूद केलेल्या प्रशिक्षणार्थीची संख्या व आरक्षणामध्ये बदल करण्याचे अधिकार मा. महासंचालक, बार्टी, पुणे यांचेकडे राखीव आहेत.
७. कोचिंग क्लासची निवड ही उमेदवाराचे गुण, संबंधित कोचिंग क्लासमधील उपलब्ध प्रवेश क्षमता व उमेदवाराचा वैकल्पिक विषय यांच्या आधारे करण्यात येईल. एखाद्या विशिष्ट कोचिंग क्लासमध्ये प्रवेश देण्याबाबत उमेदवाराकडून आग्रह, अरेरावी, राजकीय व नोकरशाही दबावतंत्राचा वापर केल्यास त्या उमेदवाराचा प्रवेश रद्द करण्यात येईल.
८. बार्टी मार्फत निवडण्यात आलेल्या कोचिंग क्लासला वैकल्पिक विषयाचे प्रशिक्षण उपलब्ध असल्यास त्याच कोचिंग क्लासमध्ये प्रवेश घेणे उमेदवारांवर बंधनकारक आहे. निवडण्यात आलेल्या कोचिंग क्लासमध्ये विद्यार्थ्यांना GS आणि CSAT आणि वैकल्पिक विषय यांचे एकत्रित प्रशिक्षण घेणे विद्यार्थ्यांकरिता बंधनकारक आहे.
१०. प्रशिक्षण कालावधीत उमेदवारांना प्रतिमाहे विद्यावेतन अदा करताना उमेदवार त्या महिन्यात किती दिवस प्रशिक्षणास उपस्थित आहे तेवढ्या दिवसाचे विद्यावेतन अदा करण्यात येईल. संबधित प्रशिक्षण संस्थेकडून प्रत्येक महिन्याचे उपस्थिती पत्रक प्राप्त झाल्यावरच विद्यावेतन अदा करण्यात येईल. प्रत्येक दिवशी विद्यार्थ्याने क्लासला उपस्थित राहण्याकरिता येता-जाता (in-out) दोन्ही वेळचे thumb impression विचारात घेतले जाईल. एका वेळेला तशी नोंद नसल्यास त्या दिवसाची अनुपस्थिती ग्राह्य धरून विद्यावेतन अदा केले जाणार नाही. विद्यार्थ्यांनी कोचिंग क्लासला उपस्थित न रहाता बार्टी कडे विद्यावेतनाकरिता दबाव आणणे याकरिता विद्यार्थ्यास प्रशिक्षणाकरिता अपात्र ठरविले जाईल.
११. वैकल्पिक विषयासाठी बार्टीमार्फत निवडण्यात न आलेल्या एखाद्या विशिष्ट कोचिंग क्लासचा विद्यार्थ्यांनी आग्रह धरल्यास ते ग्राह्य धरण्यात येणार नाही.
१२. जातीचा दाखला व या प्रशिक्षणाकरिता online फॉर्म भरताना नमूद केलेल्या उत्पन्न गटातील उत्पन्नाचा दाखला कागदपत्र पडताळणी कार्यशाळेच्या वेळी बार्टी, पुणे येथे सादर करणे बंधनकारक असेल. अन्यथा उमेदवाराची निवड ग्राह्य धरण्यात येणार नाही.

## परीक्षेचे स्वरूप-

१. परीक्षा दोन सत्रामध्ये आयोजित केली जाईल. पेपर I (General Studeis) व पेपर II (CSAT) प्रत्येकी १०० गुण प्रमाणे एकूण २०० गुणांची चाळणी परीक्षा घेण्यात येईल. प्रत्येक सत्राकरिता एक तास अवधी देण्यात येईल.

२. संघ लोकसेवा आयोग नागरी परीक्षेप्रमाणे प्रश्नपत्रिका हिंदी व इंग्रजी दोन्ही माध्यमामधून उपलब्ध करून देण्यात येईल.

| पेपर | विषय | प्रश्नसंख्या | एकूण गुण | वेळ व कालावधी |
|---|---|---|---|---|
| I | General Studies (GS) | ५० | १०० | **सकाळी ११.०० ते १२.००**<br>(१ तास) |
| II | Civil Services Aptitude Test (CSAT) | ४० | १०० | **दुपारी १२.०० ते १.००**<br>(१ तास) |
| | | **एकूण** | **२००** | **२ तास** |

## उमेदवार निवडीचे निकष-

a) पेपर I (GS) आणि पेपर– II (CSAT) of BARTI- DELHI-CET- 2020 दोन्ही पेपरमधील उपस्थिती अनिर्वाय आहे. जर उमेदवार कोणत्याही पेपर मध्ये अनुपस्थित असल्यास सदर प्रशिक्षणास त्यांची निवड ग्राह्य धरण्यात येणार नाही.

b) उत्तरपत्रिका Negative Marking प्रमाणे तपासण्यात येईल. प्रत्येक चुकीच्या प्रश्नासाठी त्या प्रश्नाच्या एकूण गुणांपैकी १/३ गुण वजा केले जातील.

c) पेपर II (CSAT) चे स्वरूप हे पात्रता पेपर (Qualifying) असे आहे. ज्या उमेदवारांना पेपर II (CSAT) मध्ये १०० पैकी किमान ३३ किंवा त्यापेक्षा जास्त गुण प्राप्त आहेत अशाच उमेदवारांचा अंतिम निवड प्रक्रियेसाठी विचार केला जाईल.

d) ज्या उमेदवारांना पेपर I (GS) मध्ये ऋण गुण असतील ते उमेदवार निवडीकरिता अपात्र राहतील .

e) पेपर I (GS) व पेपर II (CSAT) या दोन्ही पेपरच्या गुणांची बेरीज करून एकत्रित गुणांच्या उतरत्या क्रमाने गुणवत्ता यादी घोषित करण्यात येईल.

## १. आरक्षणाचे निकष-

एकूण संख्या – २००

| तपशील | एकूण |
|---|---|
| अ) अनु. जातीतील व नवबौद्ध वर्गातील सर्वसाधारण | १२२ |
| ब) महिला | ५२ |
| क) दिव्यांग | ६ |
| विशेष बाब | १० |
| वंचित जातीचा घटक (वाल्मिकी व तत्सम जाती, होलार, बेरड, मातंग, मांग, मादगी इ.) | १० |
| **एकूण (१८० + १० + १०)** | **२००** |

- सदर प्रशिक्षणातील सर्व जागांसाठी प्राधान्याने उपलब्ध गुणवत्ता यादीतील रु. ३ लाखापर्यंत उत्पन्न मर्यादा असलेल्या पात्र सर्व उमेदवारांना प्रवेश देण्यात येईल. त्यानंतर जागा उरल्यास उर्वरित जागांसाठी रु. ३ लाखापेक्षा जास्त ते रु. ६ लाख उत्पन्न असलेल्या पात्र उमेदवारांना प्रवेश देण्यात येईल.
- एकूण ५४ जागा महिला उमेदवारांकरिता आरक्षित राहतील. याप्रमाणे महिलांसाठीच्या राखीव सर्व जागांकरिता गुणवत्ता यादीच्या निकषानुसार रु. ३ लाखापर्यंत उत्पन्न मर्यादा असलेल्या पात्र महिला उमेदवारांना प्रवेश देण्यात येईल. त्यानंतर जागा रिक्त राहिल्यास उर्वरित जागांसाठी रु. ३ लाखापेक्षा जास्त ते रु. ६ लाख उत्पन्न असलेल्या पात्र महिला उमेदवारांना प्रवेश देण्यात येईल. यानंतरही महिलांसाठीच्या आरक्षित जागा रिक्त राहिल्यास संबंधित उपन्न गटातील पात्र पुरुष उमेदवारांना महिलासाठीच्या आरक्षित जागी प्रस्तावित करण्यात येईल.
- रु. ३ लाख उत्पन्न गटातील गुणवत्ता यादीतील उतरत्या क्रमाने राहिलेल्या पात्र पुरुष उमेदवारांची निवड करण्यात येईल. त्यानंतर जागा रिक्त राहिल्यास उर्वरित जागेवर रु. ३ लाखापेक्षा जास्त ते रु. ६ लाख उत्पन्न गटातील गुणवत्ता यादीतील उतरत्या क्रमाने राहिलेल्या पात्र पुरुष उमेदवारांची निवड करण्यात येईल.
- एकूण ६ जागा दिव्यांग उमेदवारांकरिता आरक्षित राहतील. पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास दिव्यांग उमेदवारांना प्रशिक्षणाची संधी मिळावी या व्यापक दृष्टीकोनातून पेपर II मधील पात्रतेची अट शिथिल करण्यात येवून त्यांना प्रशिक्षणाची संधी देण्यात येईल.
- अनुसूचित जातीतील वाल्मिकी व तत्सम जाती, होलार, बेरड, मातंग, मांग, मादगी इ. जातीतील उमेदवारांना सदर प्रशिक्षणामध्ये एकूण १० जागा वंचित जातीचा घटक अंतर्गत राखीव ठेवण्यात येतील. वंचित जातीचा घटक आरक्षण केवळ परीक्षेमध्ये सहभागी उमेद्वारांसाठीच लागू असेल.
- विद्यार्थ्यांची पहिली निवड यादी बार्टी संस्थेच्या **https://barti.maharashtra.gov.in**. संकेत स्थळावर घोषित करण्यात येईल. घोषित केलेल्या पहिल्या निवड यादीतील उमेदवारांनी प्रशिक्षणाकरिता ८ दिवसात हजर न झाल्यास, उर्वरित रिक्त जागांसाठी गुणवत्ता यादीतील उतरत्या क्रमाने द्वितीय निवड यादी घोषित करण्यात येईल.
- निवड झालेल्या उमेदवारास बार्टी संस्थेने निवडलेल्या दिल्ली येथील नामांकित कोचिंग संस्थेमध्ये घोषित केलेल्या तारखेस रुजू होणे बंधनकारक राहील.

- निवड झालेल्या उमेदवारांना दिल्ली येथील नामांकित संस्थेमध्ये संघ लोकसेवा आयोग नागरी सेवा परीक्षा २०२० च्या पूर्व व मुख्य परीक्षा पूर्व तयारी प्रशिक्षणाचा लाभ घ्यावयाचा असेल तर उमेदवारास बार्टी संस्थेसोबत साध्या हमीपत्रावर प्रशिक्षणातील अटी व नियमांच्या पालनाबाबतचा करार करावा लागेल. करारनामा सही करतेवेळी सर्व आवश्यक मूळ प्रमाणपत्रे सादर करणे बंधनकारक आहे. कागदपत्रांची पडताळणी ही पुणे येथे करण्यात येईल. जर निवड यादीतील उमेदवार सदर करार करण्यास कोणत्याही कारणास्तव अनुपस्थित राहिल्यास त्यांची प्रशिक्षणाकरिताची उमेदवारी रद्द ठरविण्यात येईल. तसेच या प्रशिक्षणामधून मिळणाऱ्या कोणत्याही लाभास तो पात्र ठरणार नाही.
- सदर प्रशिक्षणाचा लाभ घेण्याकरिता सकल कौटुंबिक उत्पन्न रु. ३ लाखापेक्षा कमी व रु. ३ लाखापेक्षा जास्त परंतु रु. ६ लाखापेक्षा कमी असे दोन उत्पन्न गट घोषित करण्यात आले आहेत. प्रवेश परीक्षेकरिता online अर्ज भरताना उमेदवारांनी ज्या कौटुंबिक उत्पन्न गटातून अर्ज केला असेल, त्याच उत्पन्न गटाचा दाखला गुणवत्ता यादीतील निवड झालेल्या उमेदवारांना मूळ कागदपत्र पडताळणी कार्यशाळेच्या वेळी बार्टी कार्यालयाकडे सादर करणे बंधनकारक आहे. अन्यथा उमेदवाराचा प्रशिक्षणासाठी प्रवेश ग्राह्य धरण्यात येणार नाही. याबाबत कोणत्याही राजकीय किंवा शासकीय दबावतंत्राचा वापर केल्यास उमेदवारावर दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल.

  टिप :- जर उमेदवार दिव्यांग असेल तर त्याने मदतनीसाची सोय करण्याची जबाबदारी उमेदवाराची राहील. तसेच परीक्षेपूर्वी त्याने परीक्षा केंद्र प्रमुखास याबाबत माहिती द्यावी.

**कागदपत्र पडताळणीकरिता आवश्यक कागदपत्रे –**

१. दहावी प्रमाणपत्र (SSC certificate or Date of Birth Certificate )

२. पदवी प्रमाणपत्र (Certificate of Graduation)

३. जात प्रमाणपत्र ( Caste Certificate)

४. जात वैधता प्रमाणपत्र (Caste Validity Certificate)

५. कौटुंबिक उत्पन्नाचा दाखला (Income Certificate of parents (income from all the sources))

६. अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate)

७. BARTI-DELHI-CET-2020 परीक्षेचे प्रवेशपत्र (admit card)

८. आधार कार्ड/ ओळख पत्र/ पॅनकार्ड/ वाहन चालक परवाना (Driving License)/ निवडणूक ओळखपत्र

९. Two Passport size photograph

# लाभ

**BARTI-DELHI-CET-2020 या निवड चाळणी परीक्षेमधून निवडण्यात आलेल्या उमेदवारांना पुढील सुविधा/ लाभ देण्यात येतील-**

१. बार्टी संस्थेमार्फत दिल्ली येथील कोचिंग क्लासची फी कोचिंग इन्स्टिट्यूटला देण्यात येते.
२. सदर प्रशिक्षण अनिवासी असल्याने उमेदवारांना दिल्ली येथील निवास व भोजनाची व्यवस्थेकरिता प्रती माह कमाल रक्कम रु. १२०००/- विद्यावेतन देण्यात येते. विद्यावेतन करिता विद्यार्थ्यांची उपस्थिती ग्राह्य धरण्यात येईल.
३. दिल्ली येथे प्रशिक्षणाच्या सुरवातीस जाण्याकरिता रु. ५०००/- (एकदा) व प्रशिक्षण संपल्यानंतर परतीच्या प्रवासाकरिता रु. ५०००/- (एकदा) प्रवास खर्च देण्यात येतो.
४. पहिल्या महिन्यातील आर्थिक सहाय्य रु. ३०००/-
५. प्रशिक्षणार्थीनी आवश्यक अहवाल बार्टी संस्थेस सादर करावे.
६. प्रशिक्षाणार्थ्यांना प्रशिक्षणादरम्यान अर्थार्जनास (नोकरी, व्यवसाय करण्यास) मनाई आहे.
७. उमेदवारास कोणत्याही टप्प्यावर कोणत्याही कारणास्तव प्रशिक्षण सोडायचे असल्यास त्या उमेदवारास प्रशिक्षणादरम्यान त्याकरिता संस्थेने केलेला खर्च पुन्हा बार्टी संस्थेस द्यावा लागेल.

# Detailed description of question paper for BARTI-DELHI-CET- 2020

## PAPER – I (General Studies)

**Number of Question – 50 (**Objective type Multiple Choice Question)

**Total Marks – 100** (2 Marks for each question)

**Negative Marking – 0.67** Marks for each wrong answer

(i.e.1/3rd of the total marks allotted for that question)

**Syllabus and the Suggested Reference books for study**

All the 50 questions of Multiple Choice type of this paper will be based on the latest syllabus of the General Studies, Paper -1 published by UPSC for Civil Services Preliminary Examination- 2019. The syllabus and the list of reference books are as follows:

| Sr. No | Syllabus | Suggested Reference books for study |
|---|---|---|
| I | Current events of national and international importance. | a) India Year Book- Govt. of India Publication,<br>b) Newspapers and magazines listed below.<br>c) ManoramaYearbook. |
| II | History of India and Indian National Movement | a) NCERT Books from std. VIII to XII.<br>b) India's struggle for Independence **by Bipin Chandra.**<br>c) India since Independence **by Bipin Chandra**<br>d) Modern Indian History **by Groover & Grooover**<br>e) Ancient India **by L.Mukherjee**<br>f) Medival India -Volume I & II **by Satish Chandra**<br>g) Medival India **by L. Mukherjee**<br>h) Modern India **by L. Mukherjee**<br>i) Indian Culture- **Spectrum Guide** |
| III | Indian and World Physical Geography, Social, Economic Geography of India and the World | a) NCERT Books from std. VIII to XII.<br>b) Physical Geography **by Goh Chen Leong**<br>c) India- A Comprehnsive Geography **by Khullar**<br>d) Geography of India **by Majid Husain**<br>e) India and world Geography **by Hussain**<br>f) Geography **by Surender Singh**<br>g) Partiyogita darpan special issue on geography<br>h) Oxford Atlas for Map |

| | | |
|---|---|---|
| IV | Indian Polity and Governance- Constitution, Political System, Panchayati Raj, Public Policy, Rights Issues, etc. | a) NCERT Books from std. VIII to XII.<br>b) Indian Polity for Civil Services Examinations **by M. Laxmikanth**<br>c) Introduction to the Constitution of India **by D.D. Basu**<br>d) Our Parliament **by Subhash Kashyap**<br>e) Constitution of India **by Bakshi** |
| V | Economic and Social Development-Sustainable Development, Poverty, Inclusion, Demographics Social, Sector initiatives, etc | a) NCERT Books from std. VIII to XII.<br>b) Indian Economy **by Mishra & Puri**<br>c) Indian Economy **by Dutt & Sundaram**<br>d) Indian Economy **by Uma Kapila**<br>e) Partiyogita darpan special issue on Economy<br>f) Economic Survey<br>g) The Budget |
| VI | General issues on Environmental Ecology, Bio-diversity and Climate Change - that do not require subject specialization | a) Environmental Ecology Biodiversity & Climate Change – Partiyogita Darpan<br>b) Environment for Civil Services Preliminary Examination **by Sachchida Nand Jha**<br>**c**) Environmental Studies from Crisis to Cure (2nd Edition) **by R.Rajagoplan**<br>d) Ecology and Environment **by P. D. Sharma** |
| VII | General Science | a) NCERT Books from std. V to X.<br>b) Tata McGraw Hill guide<br>c) Science and Technology in India – Spectrum<br>d) General Science For Civil Services Preliminary Examinations **by S.A. Majid** |

**Note: Apart from the above mentioned reference books, candidates may refer any one of the following guides:**

a) General Studies for Civil Services Preliminary Examination 2019 – Tata McGraw Hill.
b) Handbook of General Studies for Civil Services Preliminary – Spectrum.
c) UPSC Civil Services Prelims in 60 days – Rakesh Dwivedi. (Revision)
d) The Pearson CSAT Manual.
e) IAS (Pre.) Solved Papers General Studies with CSAT ( Question Bank) – Arihant.
f) IAS Prelims/CSAT Civil Services: 19 Years General Studies Topic-Wise Solved Paper (Question Bank)- Disha.

## List of Magazines/Periodicals, recommended for study

a) Civil Service Chronicle

b) Contemporary Issues

c) Civil Services Times

d) Partiyogita Darpan

e) Competition success Review

f) Front Line

g) Yojana

h) Kurukshetra

i) Economic and Political Weekly

## List of Newspapers recommended

a) The Hindu

b) Indian Express

c) Economic times

d) Times of India

e) Hindustan times

## PAPER II- (Civil Services Aptitude Test - CSAT)

**Number of Question – 40 (**Objective type Multiple Choice Question)

**Total Marks** – **100** (2.5 Marks for each question)

**Negative Marking** – **0.83** Marks for each wrong answer
(i.e 1/3$^{rd}$ of the total marks allotted for that question )

### Syllabus and the Suggested Reference books for study

All the 40 questions of Multiple Choice type of this Part will be based on the latest syllabus of the Paper -II published by UPSC for Civil Services Preliminary Examination- 2019. The syllabus and the list of reference books are as follows:

| Sr. No | Syllabus | Reference book |
|---|---|---|
| I | Comprehension | a) How to Prepare for Verbal Ability and Reading Comprehension for the CAT **by Arun Sharma**<br>b) Proficiency in Reading Comprehension – **by Ajay Singh**<br>c) English Reading Comprehension **by Anjani A Gupta**<br>d) Word Power Made Easy **by Norman Lewis**<br>e) Merriam-Webster's Vocabulary Builder<br>f) English Grammar and Composition **By Wren & Martin** |
| II | Interpersonal skills including communication skills | R.S. Aggarwal., Tata McGraw Hill. |
| III | Logical reasoning and analytical ability | Nonverbal and logical reasoning by R.S. Aggarwal, Tata McGraw Hill. |
| IV | Decision-making and problem solving | Quantitative Apitude by R.S. Aggarwal<br>. |
| V | General mental ability | Mental ability by R.S.Aggarwal., Tata McGraw Hill. |
| VI | Basic numeracy (numbers and their relations, orders of magnitude, etc.) (Class X level), Data interpretation (charts, graphs, tables, data sufficiency etc. - Class X level) | R.S. Aggarwal., Tata McGraw Hill. |

***Note: Apart from the above reference books, candidates may refer any one of the following guides for practicing UPSC exams question papers of last few years:***

a) UPSC Past exam solved question paper of - **Pearson**
b) UPSC Past exam solved question paper of - **Tata McGraw Hill**
c) UPSC Past exam solved question paper of - **Arihant Publication**

**Note: Any change / modification in the above matter will be notified only on the website https://barti.maharashtra.gov.in Candidates are advised to see the website time to time.**

**Help desk-**

Email ID : bartihelp@gmail.com

Toll Free Helpline Number : 1800-212-005599

Time : 8.00 am to 9.00 pm